| MHKO160006722018 | **नियमित दिवाणी दावा क्र.१२७/२०१८ मधील निशानी क्र १५ वरील आदेश** |
|---|---|

०१. वादी क्र. १ व २(अ) यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम १५१ व आदेश १ नियम १० प्रमाणे सदर दाव्यात आवश्यक पक्षकार सामील होणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादीं यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द हक्कज्ञापनासाठी व प्रत्यक्ष कब्जा मिळण्यासाठी दाखल केला असून दाव्याची चौकशी सुरू आहे. वादीं यांनी कथन केले की सदर दाव्याचे कामी नि.३ सोबत ७/१२ पत्रकी वालूबाई नामदेव चाळके यांचे नावाची नोंद असून त्यांना नजरचुकीने या कामी प्रतिवादी म्हणून सामील करणेचे राहून गेले आहे. वादी यांनी पुढे कथन केले की वादी क्र. १ यांनी यापूर्वी रे.क.नं.३१/२०१६ हा दावा प्रतवादी क्र. १ व वालूबाई नामदेव चाळके यांचेविरूध्द मनाईचा दावा मिळकतीसंदर्भात दाखल केला होता, तथापि सदरचा दावा वादी यांनी काढून घेतला. त्यानंतर सदरचा दावा दाखल करताना वालूबाई नामदेव चाळके यांना प्रतिवादी म्हणून सामील करणेचे नजरचुकीने राहून गेले. वादींनी कथन केले की वालूबाई नामदेव चाळके यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध व वहिवाट नसताना त्यांनी दि.२४/१२/२०२३ रोजी कार्यकारी संचालक निनाईदेवी सहकारी साखर कारखाना लि. करंगुली, ता. शिराळा या कारखान्यास ऊस तोडून परस्पर कारखान्यास आणलेबाबत खोटा अर्ज दिला आहे. शेवटी त्यांनी वालूबाई नामदेव चाळके यांना सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. २ पक्षकार म्हणून सामील करणेबाबत विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देऊन कथन केले की सदरचा अर्ज कायदेशीर तरतूदींविरोधी आहे, सदर अर्जात पक्षकार म्हणून सामील करणेकामी कायदेशीर निकष नमूद नाहीत. शेवटी, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०४.** मी वादी क्र. १-२(अ), प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादीं आणि प्रतिवादी यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द मौजे आळतूर, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर गट नं ४०३, ४७२ व ४७३ चे संदर्भात हक्कज्ञापनासाठी व प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीं यांचे कथनानुसार वालूबाई नामदेव चाळके यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध व वहिवाट नसताना त्यांचे दावा मिळकतीवर त्यांचे नावाच्या चुकीच्या नोंदीचा गैरफायदा घेऊन दि.२४/१२/२०२३ रोजी तिने कार्यकारी संचालक निनाईदेवी सहकारी साखर कारखाना लि. करंगुली, ता. शिराळा या कारखान्यास ऊस तोडून परस्पर कारखान्यास आणलेबाबत खोटा अर्ज दिला आहे. सबब, वालूबाई नामदेव चाळके यांना सदर दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणेबाबत त्यांनी विनंती केली. याउलट प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे देऊन कथन केले की सदरचा अर्ज कायदेशीर तरतूदींविरोधी आहे. दोन्ही बाजूंची परस्पर विरोधी कथने पाहता सदरची बाब सिध्द होण्यासाठी विस्तृत पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तथापि प्रथमदर्शनी असे दिसते की वालूबाई नामदेव चाळके यांचे नावाची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी आहे, त्यामुळे वादीं-प्रतिवादी यांचेमधील सर्व वादमुद्दांचे निराकरण होणेसाठी व दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वालूबाई नामदेव चाळके यांना सदरकामी पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज कायदेशीर तरतूदींविरोधी आहे असे कथन केले आहे, तथापि याबाबत स्पष्टपणे खुलासा केलेला नाही. वादीनी सदरकामी पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची विनंती केलेले वालूबाई नामदेव चाळके यांचे नाव दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद असल्याचे दिसून येत आहे. वादी यांची दुरूस्ती ही वादी व प्रतिवादीं यांचेमधील सर्व वादमुद्दे निकाली काढण्यासाठी महत्वाची आहे. तसेच सदरची दुरूस्ती ही फॉरमल स्वरूपाची असून यामुळे दाव्याचे स्वरूपावर कोणताही परिणाम होणार नाही. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी व सदर दाव्यात विविध निरनिराळे वाद व गुंतागुंत टाळण्यासाठी सदरची दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

**०१** अर्ज नि.१५ मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादीं यांनी प्रतिवादी यांना रक्कम रू.२००/- द्यावे या अटीवर वादी यांना अर्जात नमूद केलेप्रमाणे वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्यास व वालूबाई नामदेव चाळके यांना सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र २ म्हणून समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**०३.** वादीं यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दावा दुरूस्त प्रत न्यायातयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Shraddha Dinkar Bagal
Date: 2024.09.06 12:17:38 +0530

**दिनांक- ०३/०९/२०२४** **( एस. डी. बागल )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**

**मलकापूर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर.**